आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१३ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- हर घर तिरंगा अभियानानिमित्त ठिकठिकाणी तिरंगा यात्रांचं आयोजन
- देशात कोळसा उत्पादन वाढवण्यासाठी केंद्रसरकारची महत्त्वाकांक्षी योजना
- वक्फ दुरुस्ती विधेयकाविषयी संयुक्त संसदीय समितीच्या अध्यक्षपदी जगदंबिका पाल यांची नियुक्ती
- कोलकात्यात महिला निवासी डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे उच्च न्यायालयाचे निर्देश
- राष्ट्रपती भवनात अमृत उद्यान २०२४चं उद्या उद्घाटन

  **आणि**
- महाराष्ट्र सरकारचे सांस्कृतिक पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

९ ऑगस्टपासून सुरु झालेल्या हर घर तिरंगा अभियानाचं चैतन्यपूर्ण स्वरूप देशभरात दिसून येत आहे.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नवी दिल्लीतल्या भारत मंडमप इथं घरोघरी तिरंगा बाईक रॅलीला आज सकाळी हिरवा झेंडा दाखवला. घरोघरी तिरंगा ही एक चळवळ झाली असून कोट्यवधी भारतीय आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावत आहेत, असं उपराष्ट्रपती म्हणाले.

नागरिकांमध्ये एकता आणि राष्ट्राभिमान यांची जोपासना करण्याच्या हेतूने आज संध्याकाळी अहमदाबाद इथं तिरंगा यात्रा झाली. या यात्रेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे सहभागी झाले होते. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल हे सुद्धा या यात्रेत सहभागी झाले.

हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत लडाखमधल्या उत्तर विभाग सांस्कृतिक केंद्राने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यात कलाकार, शिक्षक, विद्यार्थी यांनी भाग घेतला.

हर घर तिरंगा अभियानाचा भाग म्हणून अरुणाचल प्रदेशात काढलेल्या सहा हजार फूट लांब तिरंगा यात्रेवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संतोष व्यक्त केला आहे. हर घर तिरंगा अभियानाला मिळणारा हा उत्साही प्रतिसाद आनंद देत असल्याचं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेते योगेश सोमण म्हणाले…

**होल्ड--बाईट - योगेश सोमण**

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या देशाच्या ७८व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशाला संबोधित करणार आहेत. आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून संध्याकाळी सात वाजता त्याचं प्रसारण होईल. त्यामुळे आकाशवाणीच्या मुंबई केंद्रवरचं प्रादेशिक बातमीपत्र संध्याकाळी पावणे सात वाजता प्रसारित होईल.

दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरूनही आधी हिंदीत आणि त्यानंतर इंग्रजीत हे संबोधन प्रसारित केलं जाईल. त्यानंतर दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवर प्रादेशिक

भाषांमध्येही या संबोधनाचं प्रसारण होईल. आकाशवाणीवरून रात्री साडे नऊ वाजता हे संबोधन प्रादेशिक भाषांमधून प्रसारित होईल.

<><><><><>

केंद्र सरकारने येत्या १५ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतल्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याला पंचायती राज संस्थांच्या निवडून आलेल्या चारशे प्रतिनिधींना विशेष पाहुणे म्हणून लाल किल्ल्यावर आमंत्रित केलं आहे. त्यात महिला प्रतिनिधींचा समावेश आहे. पंचायती राज मंत्रालयानं उद्या नवी दिल्लीत पंचायतींमधल्या महिला नेतृत्वाविषयीच्या कार्यशाळेचं आयोजन केलं आहे. पंचायतींमधल्या महिला लोकप्रतिनिधींसमोरची आव्हानं आणि स्थानिक प्रशासनात महिलांचा सहभाग वाढवणे या धोरणांवर कार्यशाळेत चर्चा होणार आहे. केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव सिंह आणि पंचायत राज राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल हे उद्या त्यांचा सत्कार करणार आहेत. या कार्यशाळेतच ई-ग्रामस्वराज हे बहुभाषिक व्यासपीठ सुरू केलं जाणार आहे.

<><><><><>

दिल्लीच्या छत्रसाल मैदानावर होणाऱ्या राज्यस्तरीय स्वातंत्र्यदिन सोहळ्यात ध्वजारोहणासाठी दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी दिल्लीचे गृहमंत्री कैलाश गेहलोत यांना नामनिर्देशित केलं आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे अबकारी कर धोरण प्रकरणी सीबीआय कोठडीत असल्यामुळे हा निर्णय घेतला आहे. दरम्यान आम आदमी पक्षानं या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या राष्ट्रपती भवनात वार्षिक उन्हाळी अमृत उद्यान २०२४चं उद्घाटन करणार आहेत. हे उद्यान १५ सप्टेंबरपर्यंत जनतेसाठी खुलं राहणार आहे. उद्यानातल्या काही प्रमुख आकर्षणांत बोन्साय गार्डन, सेंट्रल लॉनमधील दुर्मिळ आणि विदेशी फुलांचे लँडस्केप, लांबलचक रोझ गार्डन, भव्य वटवृक्ष, ट्री हाऊससह बाल वाटिका आणि परस्परसंवादी साउंड पाईप प्रदर्शन यांचा समावेश आहे. यावर्षी प्रथमच २९ ऑगस्टला राष्ट्रीय क्रीडा दिनी अमृत उद्यानात खेळाडूंना आमंत्रित करण्यात आलं आहे. अभ्यागतांच्या सुविधेसाठी केंद्रीय सचिवालय मेट्रो स्टेशनपासून मोफत शटल बस सेवा देखील उपलब्ध असून त्यांना पर्यावरणपूरक सीड पेपर्स स्मृतीचिन्ह दिलं जाणार आहे. शाळा आणि महाविद्यालयातले शिक्षक तसचं विद्यार्थ्यांनाही आमंत्रित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

देशात कोळसा उत्पादन वाढवण्याची महत्त्वाकांक्षी योजना केंद्रसरकारने आखली आहे. जागतिक पातळीवर खाण उद्योगात कार्यरत कंपन्यांकडे हे काम सोपवण्यात येणार आहे. त्यामुळे अद्ययावत तंत्रज्ञान आणि कार्यक्षमता उपलब्ध होईल असं केंद्रीय कोळसा मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. या कंपन्या कोळसा उत्खननाबरोबरच पुनर्वसन, भूसंपादन, पर्यावरण विषयक परवानग्या तसंच केंद्र आणि राज्यसरकारांच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाबरोबरचा समन्वय ही कामं देखील हाताळणार असल्याचं या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ साठी गठीत करण्यात आलेल्या  संयुक्त संसदीय समितीच्या अध्यक्षपदावर भाजपा खासदार जगदंबिका पाल यांची नियुक्ती केली आहे. विधेयकावर पुढल्या

पडताळणीसाठी ३१ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून, संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटच्या दिवशी ही समिती आपला अहवाल सादर करेल.

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे निर्देश कोलकाता उच्च न्यायालयानं आज दिले. पोलिसांनी या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्र तात्काळ सीबीआय कडे सोपवावीत असे निर्देश न्यायालयानं दिले. तसंच राज्यसरकारला आतापर्यंत केलेल्या तपासाचा अहवाल सादर करण्याचा आदेश दिला. न्यायालयानं शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य संदीप घोष यांना अनिश्चित काळासाठी रजेवर जाण्याचा आदेश दिला. घोष यांचा जवाब नोंदवण्यामध्ये झालेल्या विलंबाबद्दल प्रश्न उपस्थित करत, आंदोलनकर्त्या डॉक्टरांची समस्या दूर करण्यासाठी राज्यसरकार काय उपाय करत आहे, अशी विचारणा केली.

आरोग्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीत कोणताही तोडगा निघाला नसल्यामुळे आपला बेमुदत संप चालूच ठेवण्याचा निर्णय 'फोरडा' या निवासी डॉक्टर संघटनेनं घेतला आहे. कोलकाता इथल्या या घटनेच्या निषेधार्थ, देशभरातल्या सरकारी रुग्णालयांमधल्या निवासी डॉक्टरांनी कालपासून बेमुदत संप पुकारला आहे. पश्चिम बंगालचे आरोग्य सचिव नारायण स्वरुप निगम यांनी डॉक्टरांना संप मागे घेण्याचं आवाहन केलं आहे.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज भारतीय वैद्यकीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली.

दरम्यान, राज्यातल्या सरकारी रुग्णालयांमधल्या महिला डॉक्टर्सच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करत, पश्चिम बंगाल विधानसभेतले विरोधी पक्षनेते आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते सुभेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**<><><><>**

तरंग शक्ती या, देशातल्या सर्वात मोठ्या बहुराष्ट्रीय लष्करी सरावादरम्यान तेजस या स्वदेशी बनावटीच्या हलक्या लढाऊ विमानानं जगातल्या अत्याधुनिक लढाऊ विमानांच्या बरोबरीनं आपल्या क्षमतेची झलक दाखवली. तमिळनाडूच्या सुलूर हवाई तळावर झालेल्या या सरावात राफेल, युरोफायटर टायफून यासारख्या परदेशी लढाऊ विमानांच्या जोडीनं तेजसनं भरारी घेतली. एकंदर ११ देशांच्या लष्करांनी या सरावात सहभाग घेतला आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्सनं विकसित केलेलं तेजस हे त्याच्या प्रवर्गातलं सगळ्यात कमी वजनाचं लढाऊ विमान आहे.

**<><><><>**

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार यंदा ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांना जाहीर झाला आहे. याखेरीज प्रकाश बुद्धिसागर, शुभदा दादरकर यांनाही पुरस्कार मिळाले आहेत. विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कार २०२३ साठी शशिकला झुंबर सुक्रे यांना तर २०२४ साठी जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे.

राज्य गुजराती साहित्य अकादमीचा कवी नर्मद पुरस्कार यंदा ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड आणि ईश्वरलाल परमार यांना जाहीर झाला आहे. येत्या २४

ऑगस्ट रोजी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

//<><><><><>//